Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-II FEBRUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# विकास आणि कोकणातील प्रकल्प विरोधी आंदोलन

प्रा. विराज द. महाजन,
खरे-ढेरे महाविद्यालय, गुहागर

## प्रस्तावना

विकासविषयक संकल्पनेचा अभ्यास गेली अनेक वर्षे विविध अंगानी सुरु आहे.१९५० नंतरच्या काळात विकास विषयक कार्यक्रमांच्या माध्यमातून घडून येणा-या सामाजिक परिवर्तनाच्या सकारात्मक बाजूंचा आढावा आजपर्यंत अनेक अभ्यासकांनी केला आहे. १९९० नंतरच्या काळात जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण आणि खाजगीकरणाचे धोरण भारताने स्वीकारले आहे. त्यातून बहुराष्ट्रीय कंपन्या आणि जागतिक भांडवलशाहीचा शिरकाव भारतीय बाजारपेठेत झाला आहे. कृषी, वित्त, शिक्षण, आरोग्य, ऊर्जा निर्मिती, विमा एवढेच काय मत्स्योत्पादनापासून ते प्रसारमाध्यमांपर्यंत सर्वच क्षेत्रात हा परिणाम जाणवत आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावातून सांस्कृतिक जीवन व समाजमूल्येही सुटलेली नाहीत. थोडक्यात विकासविषयक धोरणांचे परिणाम विविध क्षेत्रात उमटत आहे. विशेषत: औद्योगिक क्षेत्रात ते जास्त जाणवत आहेत. औद्योगिकीकरणाला मिळालेली चालना आणि त्यातून निर्माण होणारे प्रदूषण पर्यावरणादि प्रश्न, विस्थापन, पुनर्वसनविषयक संघर्ष ही बाब नित्याचीच झाली आहे. त्यातूनच विकासविषयक पेच निर्माण होतात.

राज्यकर्ते, राजकारणी आणि विकास योजना कालबद्ध राबविणारी नोकरशाही यांना जी विकासाची कल्पना अभिप्रेत असते ती पर्यावरणवादी चळवळीच्या नेतृत्वाला व समर्थकांना बहुधा मान्य नसते. कारण ज्या विकास प्रकल्पांमुळे पर्यावरण, जैविक विविधता व विस्थापितांचे प्रश्न निर्माण होतात त्याला विकास म्हणता येणार नाही. याउलट काही लोक विस्थापित होतात म्हणून विकास प्रकल्प राबवायचे नाहीत ही भूमिका विकासाच्या समर्थकांना मान्य नसते. थोडक्यात विकासातून नेमके काय साधायचे? त्या उद्दीष्टांची आणि ती स्वीकारण्यामागील भूमिकेची व जीवनमूल्यांची बरीच गुंतागुंत आहे. म्हणजेच विकासाचे धोरण राज्यसंस्था ठरविते. विकासातून कोणती उद्दीष्टये साध्य करायची, त्यासाठी साधनसामुग्री कोठून उपलब्ध करुन घ्यायची व कोणते उपक्रम प्राधान्याने राबवायचे याविषयीचे निर्णय शासन पातळीवर घेतले जातात. शासनाला लोकांची अधिमान्यता असते. थोडक्यात निर्णयप्रक्रिया पारदर्शी असावी ही आदर्शवत स्थिती आहे. प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असते. विकासाचे धोरण राबविताना स्थानिकांना विश्वासात घेतले जाते का? हा प्रश्न अलिकडच्या काळात महत्त्वाचा ठरला आहे. भूसंपादन, प्रकल्प आखणी, नुकसान भरपाई, प्रदूषण, विस्थापन, पुनर्वसन असे अनेक प्रश्न या प्रक्रियेत निर्माण होतात. अर्थात या प्रश्नांना समर्थक आणि विरोधकांच्या आपापल्या बाजू असतात. त्यांच्या संघर्षातून विकासाचे राजकारण आकाराला येते.

## सामाजिक चळवळी

सामाजिक चळवळींचे विश्व हे विलक्षण गतीमान, व्यामिश्र आणि तितकेच व्यापक आहे. एक स्वतंत्र सामाजिक प्रक्रिया आणि घडामोड म्हणून सामाजिक चळवळींचा अभ्यास विसाव्या शतकात सुरु झाला असला तरी जसजसे या प्रक्रियेचे भान अभ्यासकांना व निरीक्षकांना येत चालले तसतश्या सामाजिक चळवळी या मानवी समाजजीवनाइतक्याच जुन्या असून त्यांच्या माध्यमातूनच समाजाचा विकास व स्थित्यंतर घडून आले याचा उत्तरोत्तर प्रत्यय येत चालला आहे. म्हणूनच एकेकाळी स्थिर समाजजीवनातील अपवादभूत घडामोड म्हणून सामाजिक चळवळींकडे पाहण्याची जी दृष्टी होती ती कालबाह्य झाली असून सामाजिक चळवळी हा सामाजिक जीवनाचा नित्याचा आणि अविभाज्य भाग असल्याची जाणीव अभ्यासकांत निर्माण झाली. “सामाजिक चळवळी” नावाच्या विद्याशाखाही अलिकडे विविध विद्यापीठांतून विकसीत झाल्या आहेत.

सामाजिक घडामोडी आणि प्रक्रियांचा अभ्यास आणि त्याचा राजकीय प्रक्रियेशी असलेला संबंधही अभ्यासण्याची निकड निर्माण झाली आहे. थोडक्यात सामाजिक चळवळींचे क्षेत्र उत्तरोत्तर व्यापक बनत चालले आहे. सामाजिक चळवळींची केवळ अभ्यासकानाच भुरळ पडली असे नाही तर सर्वसामान्य माणसाचा दैनंदिन अवकाश सुद्धा चळवळींनी व्यापला आहे. विकास प्रकल्प किंवा भांडवलशाही विकास संकल्पनेमुळे होणारे सर्वसामान्यांचे विस्थापन, जमीन अधिग्रहण यामुळे विस्थापितांच्या चळवळी उभ्या राहतात. राज्यसंस्था किंवा राजकीय पक्षांकडून होणारी फसवणूक आणि त्यातून निर्माण होणारी अन्यायाची भावना चळवळींना बहुतांश वेळा जन्म देते. आपले प्रश्न चळवळींच्या माध्यमातून सुटू शकतात याची जाणीव झाल्यानेच सर्वसामान्य माणूस चळवळींमध्ये सहभाग घेतो. अन्यायाला वाचा फोडण्याचा, दमनकारी शासनसंस्थेला काबूत ठेवण्याचा मार्ग म्हणून तो चळवळींमध्ये सामील होतो.

सामाजिक चळवळींची व्यापकता लक्षात घेता त्याचा नेमका अर्थ शोधणे अशक्य आहे. प्रदेशपरत्वे चळवळींचे स्वरुप व रचना बदलत गेल्याने त्याचा नेमका आशय मांडता आलेला नाही. तरीसुद्धा "बदल किंवा परिवर्तनासाठी केलेली सामूहिक कृती" इथपर्यंत आज सामाजिक चळवळींची व्याप्ती वाढली आहे. २०व्या शतकात तर "समूहांचा सामाजिक हस्तक्षेप" या दृष्टीने चळवळीकडे पाहिले गेले. पण जन चळवळी या केवळ सामाजिक हस्तक्षेप नव्हे तर ती एक लोकांनी केलेली उद्देशपूर्ण, सहेतुक जाणीवपूर्वक व विवेकशील कृती असते. इतकेच नव्हे तर सामाजिक पुनर्घटनेचा त्याचा उद्देश असतो.अशा पद्धतीच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे लोकचळवळींचे महत्त्व वाढले. एवढेच नव्हे तर त्यांना प्रतिष्ठाही प्राप्त झाली आहे. थोडक्यात सामाजिक चळवळी रचनात्मक, विकासात्मक व काही वेळा संघर्षात्मक भूमिका घेऊन आपले उद्देश साध्य करीत असतात. अशा प्रयत्नांतूनच चळवळींची रचनात्मक, विद्रोही, अस्मितादर्शी, संघर्षवादी, सेवाभावी, राजकीय, बिगर राजकीय, हितसंबंधात्मक अशी विविध रुपे निर्माण होतात.

## भारतातील पर्यावरणीय प्रश्न आणि सामाजिक चळवळी

"सामाजिक चळवळी" ही संकल्पना विविध पातळयांवर अभ्यासली जात आहे. परिणामी त्याच्या सिद्धांताबाबत एकवाक्यता आढळत नाही. सुरुवातीच्या अभ्यासकांनी सामाजिक चळवळींकडे अभिव्यक्तीचा आवश्यक पर्याय किंवा मुख्य राजकीय आधार म्हणून पाहिले. त्यामुळे या चळवळींचे स्वरुप व्यापक जनआंदोलनांपेक्षा काहीसे संघटित राजकीय पक्षांपेक्षा काहीसे अनौपचारिक आणि सर्वसामान्य सामाजिक प्रवाहांपेक्षा विशेष असे राहिले. डेसा पोत्रा आणि डायना (२००६) दोहेत्री (२००२) यासारख्या अभ्यासकांनी सामाजिक चळवळींच्या परिवर्तनवादी बाजूंवर भर दिला आहे. घनश्याम शहा (१९९०) सामाजिक चळवळींकडे उद्दिष्टपूर्तीसाठी जाणीवपूर्वक केलेले सामूहिक दिग्दर्शन या अंगाने पाहतात. काही अभ्यासकांनी सामाजिक चळवळी या राजकीय पक्षांपेक्षा भिन्न आणि अभिव्यक्तीचे राजकारण हा सामाजिक चळवळींचा आत्मा आहे या दृष्टीने विचार केला आहे. असे असले तरी पर्यावरणीय चळवळींपुढील प्रश्न आणि त्यासंदर्भातील आंदोलने हाही अभ्यासकांच्या चर्चेचा विषय राहिला आहे. सर्वच पर्यावरणीय चळवळी शोषणमुक्तीचा विचार मांडतात असे नाही. रुटस् (Roots : २००४) यांच्या मते "पर्यावरणीय प्रश्न ही पर्यावरणीय चळवळींची सामाजिक बांधिलकी आहे. पण भारतातील पर्यावरणीय चळवळींचा विचार करता केवळ सामाजिक बांधिलकी महत्त्वाची नाही तर त्यांची राज्यव्यवस्थेविरोधातील कृती आणि वैचारिक दृष्टीकोन महत्त्वाचा ठरतो." थोडक्यात भारतातील पर्यावरणीय चळवळी या फक्त "पर्यावरणीय" (Green) किंवा स्वच्छतावादी (clean) किंवा जतनापुरत्या मर्यादित नाहीत तर स्थानिक गरीबांच्या अस्तित्त्वासाठी लढणा-या आहेत."

## भारतातील वादग्रस्त प्रकल्प

१) नियमगिरी (ओरिसा) – वेदांत बहुराष्ट्रीय प्रकल्प
२) विशाखापट्टणम (आंध्रप्रदेश) - आराकू बॉक्साईट उत्खनन प्रकल्प

३) कलिंगनगर (ओरिसा) - टाटा स्टील प्रकल्प
४) बेल्लारी (कर्नाटक) – विमानतळाच्या भूसंपादन विरोधातील जनआंदोलन
५) दाद्री गाझियाबाद (उ.प्र.) – रिलायन्स वीज प्रकल्प
६) ओरिसा – पॉस्को खाण प्रकल्प
७) यमुना एक्सप्रेस हायवे प्रकल्प
८) कर्नाटक व गोवा खाणप्रकल्प
९) झारखंड व कर्नाटक - आरसेलर मित्तल कंपनीचे स्टील प्रकल्प

रामचंद्र गुहा यांनी भारतातील पर्यावरणीय चळवळींना एखाद्या छत्रीची उपमा दिली आहे. त्यामध्ये स्थानिक संघर्ष, प्रामुख्याने गरीबांनी आपल्या अस्तित्त्वासाठी दिलेले लढे, चिपको आंदोलन, केरळ मधील सायलेंट व्हॅली धरणाविरुद्ध मोहीम, नर्मदा बचाओ आंदोलन, इ. चळवळी याच गोष्टीच्या निदर्शक होत्या. इथल्या राज्यकर्त्यांच्या भांडवलशाही विकासाच्या धोरणामुळे १९८० नंतरच्या दशकात भारतभर मोठी धरणे व प्रकल्पांविरुद्ध जोरदार लढे झाले. सिंगरौली (उ.प्र.) कोएल कारो, सुवर्णरेखा (झारखंड), उकई, मही-कडाणा (गुजरात),चिलिका (उडीसा), कोयना (महाराष्ट्र) इ. प्रकल्पांविरुद्ध जनआंदोलने उभी राहिली.या सर्व प्रकल्पांमध्ये "विस्थापन" हा प्रमुख मुद्दा राहिला. थोडक्यात विस्थापितांचे हक्क, वितरणात्मक न्याय, पुनर्वसन, प्रकल्पाच्या सार्वजनिक हिताच्या दाव्याची तपासणी करण्याचा हक्क, नैसर्गिक साधनसंपत्ती वरील स्थानिकांचा हक्क इ. मुद्दे भारतीय पर्यावरणीय चळवळीत महत्त्वाचे ठरले आहेत.

**महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण**

१९७० च्या दशकात पर्यावरणीय चळवळींना देशात सर्वत्र महत्त्व प्राप्त झाले. महाराष्ट्रही त्याला अपवाद नव्हता. प्रस्थापित विकासासंबंधी गंभीर प्रश्नांना येथे तोंड फुटत असले तरी सर्व प्रस्थापित राजकीय पक्ष व संघटनांची हा विकास कसा असावा याबद्दल एकवाक्यता दिसते. भारताचा न्यूयॉर्क, बँकॉक, हाँगकॉग, कॅलिफोर्निया करण्याची स्वप्ने येथील राज्यकर्त्यांनी पाहिली आहेत. जास्तीत जास्त नैसर्गिक साधन संपत्तीची लूट करणा-या भांडवलशाही विकास संकल्पना रेटण्याच्या शासनाच्या धोरणामुळे स्थानिक पातळीवर जनआंदोलने उभी राहिली आहेत. मोठी धरणे बांधून विकासाची स्वप्ने पाहणा-या शासनाला अजूनही कोयना प्रकल्पाच्या विस्थापितांचा प्रश्न मार्गी लावता आलेला नाही हे वास्तव आहे. पर्यावरण संतुलन, विनाशकारी विकास, विस्थापितांचे योग्य पुनर्वसन हे कोयना प्रकल्पग्रस्त समितीने उभ्या केलेल्या जनआंदोलनाचे महत्त्वाचे प्रश्न ठरले आहेत. धरणग्रस्तांच्या चळवळीत डॉ. बाबा आढाव व डॉ. भारत पाटणकर यांचे योगदान उल्लेखनीय ठरले आहे.

कोकणच्या भौगोलिक स्थानामुळे अनेक उद्योजकांचे लक्ष या भागाकडे वेधले गेले आहे. मुंबईशी असलेल्या सान्निध्यामुळे ठाणे व रायगड जिल्हे प्रकाशझोतात आले. वीज प्रकल्पांसाठी लागणारे मुबलक पाणी प्रदूषित पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी असलेले समुद्रसान्निध्य,कच्च्या मालाची आयात –निर्यात करण्यासाठी लागणा-या बंदरांची शक्यता, कोकणरेल्वेमुळे उर्वरीत भारताबरोबर दळणवळणाची उत्तम सोय या कारणांमुळे रासायनिक उद्योग व वीजनिर्मिती उद्योगांसाठी कोकण ही सुवर्णभूमी ठरली आहे.

ऊर्जा प्रकल्पांवरुनही महाराष्ट्रात जनआंदोलने उभी राहिली आहेत. एन्रॉनविरोधी संघर्ष १९९० च्या दशकात गाजला. एन्रॉनविरोधी कृती संघर्ष समितीने दिलेल्या लढयात पर्यावरणीय संतुलन, विस्थापितांचे पुनर्वसन, विजेसाठी द्यावा लागणारा वाढीव दर, सागरी प्रदूषण व मच्छिमारांचे प्रश्न तसेच जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतील शासनाची भूमिका या बाबी महत्त्वपूर्ण ठरल्या.१९९२ च्या सुमारास रत्नागिरीतील स्टरलाईट प्रकल्पालाही स्थानिकांनी विरोध केल्यामुळे तो तामिळनाडूत हलवावा लागला.अलिकडच्या काळात कोकणातील राजापूर, तालुक्यातील जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाच्या विरोधात सुरु असलेल्या आंदोलनातही हेच

मुद्दे पुन्हा पुढे आले आहेत. आपल्या दमनकारी शक्तीचा वापर करुन सरकार हे आंदोलन चिरडून टाकू पहात आहे. शिवाय कोकणात १४ ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित आहेत. गुहागर तालुक्यातील महाजनकोचा धोपावे गावात होऊ घातलेला औष्णिक ऊर्जा प्रकल्पही जमीन संपादन प्रक्रियेच्या पूर्वीच वादग्रस्त ठरला आहे. स्थानिक जनतेचाही या प्रकल्पाला विरोध आहे. विशेष म्हणजे एन्रॉन प्रकल्पाच्या ४० कि.मी. च्या परिघात शासनाने आणखी चार प्रस्तावित ऊर्जा प्रकल्पांना मान्यता दिली आहे. परिणामी शासनाविषयी लोकांच्या मनात असंतोष आहे. त्यातच आणखी भर म्हणजे “गेल” कंपनीने मुंबई ते बेंगलोर अशी वायू वाहिनी टाकण्याचे काम सुरु केले आहे. स्थानिक पातळीवर भूसंपादन तसेच कंपनीच्या दादागिरीला स्थानिकांचा विरोध सुरुच आहे. फिनोलेक्स आणि जिंदालच्या ऊर्जा प्रकल्पांना स्थानिक जनतेने आपला विरोध दर्शविला आहे. मात्र हे दोन्ही प्रकल्प पुढे रेटण्याचे प्रयत्न होत आहेत.

कोकणच्याच बाबतीत बोलायचे तर सिंधुदुर्ग जिल्हयात कळणे गावात डेम्पो मायनिंग प्रकल्पाला शासनाने मंजुरी दिली आहे. या प्रकल्पात स्थानिक आमदार तसेच मंत्री व राजकीय पक्षांचे नेते यांचे हितसंबंध गुंतले आहेत. गेली पाच वर्षे तेथील जनता स्थानिक पातळीवर आंदोलने करीत आहे. पण शासनाने या जनआंदोलनांकडे दुर्लक्ष केले आहे. अशाच प्रकारचा स्थानिक पातळीवरचा संघर्ष रत्नागिरी जिल्हयातील वेळास (ता. मंडणगड) येथील आशापुरा मायनिंग कंपनी विरोधात स्थानिक ग्रामस्थांनी सुरु केला आहे. त्यासंदर्भातील प्रश्न महाराष्ट्राच्या विधानसभेतही गाजला. महाराष्ट्र सरकारने संबंधित कंपनीच्या बेकायदा उत्खननाच्या संदर्भात तपासणीचे आदेश दिले आहेत. मात्र गोव्यात ज्या पद्धतीने संघटितपणे खाणकाम कंपन्याना विरोध होतो तसा महाराष्ट्रात होताना दिसत नाही. या क्षेत्रात नागरी समाज संघटनांचे योगदान जसे गोव्यात ठळकपणे दिसते तसे महाराष्ट्रात दिसत नाही. शास्त्रशुद्ध अभ्यास करुन नागरी समाज संघटनांनी खाणकंपन्यांच्या लॉबीला गोव्यात शह देण्यात ब-यापैकी यश मिळवले आहे.

८० च्या दशकात कोकणात उभा राहिलेला आणखी एक संघर्ष म्हणजे प्रदूषणविरोधी लढा. १९८० नंतरच्या कालखंडात कोकणात उद्योगांची वाढ सुरु झाली. MIDC च्या माध्यमातून रायगड, रत्नागिरी व काही प्रमाणात सिंधुदुर्गात उद्योग प्रस्थापित झाले. यातील बहुतांश उद्योग हे रासायनिक असल्याने त्यांच्यामार्फत होणा-या प्रदूषणाच्या प्रश्नावर आंदोलने झाली. चिपळूण जवळच्या लोटे-परशुराम MIDC तून होणा-या प्रदूषणासंदर्भात “श्रमिक सहयोग व दाभोळ चार गाव संघर्ष समितीने” जनआंदोलन उभारले. या प्रदूषणाने पिण्याचे पाणी प्रदूषित झाले. स्थानिक मच्छिमारांवर बेकार होण्याची वेळ आणली. शिवाय आंबा व काजू या मुख्य उत्पादनांवर दुष्परिणाम झाले. आजही या भागात HPCL चा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. भूसंपादन करण्यास शासनाने सुरुवातही केली आहे. त्याविरोधात जनआंदोलनांची पूर्वतयारी म्हणून एक कृती संघर्ष समितीही गठीत झाली आहे.

रायगड जिल्हा मुंबईला लागून असल्याने औद्योगिकीकरणाची प्रक्रिया खूप लवकर येथे सुरु झाली. रायगडमधील शे.का.प. चे नेते ना.ना. पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेली शेतक-यांची आंदोलने गाजली होती. अलिकडच्या काळात शासनाने जाहीर केलेल्या विशेष आर्थिक क्षेत्राविषयीच्या धोरणामुळे (SEZ) रायगड जिल्हयात शेतक-यांच्या असंतोषाचा उद्रेक झाला. रायगड जिल्हा हा महाराष्ट्रातील सेझ च्या महापूराने ग्रस्त झालेला जिल्हा असे त्याचे सार्थ वर्णन करता येऊ शकेल. रायगड जिल्हयात ११ सेझ प्रकल्प प्रस्तावित आहेत. आणि त्यासाठी ५०,००० एकर जमीन संपादित केली जाणार आहे, की जी स्थानिकांकडून शेतीसाठी, मीठागरांसाठी जनावरांच्या कुरणासाठी वापरली जाते. रिलायन्स इंडस्ट्रिज लि. च्या महामुंबई सेझ प्रकल्प पनवेल, पेण व उरण या तीन तालुक्यातील ४५ गावात सुरु केला जाणार होता. त्यासाठी १४,००० हेक्टर जमीन संपादित केली जाणार होती. या प्रकल्पाला ४५ गावातील प्रकल्पग्रस्तांनी संघटित विरोध केला. महामुंबई सेझविरोधी संघर्ष समिती, जागतिकीकरण विरोधी कृती समिती,शेतकरी कामगार पक्ष, जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, चौविस गाव सेझ विरोधी संघर्ष समिती, लोकशासन आंदोलन, पंचक्रोशी खारभूमी खेती बचाओ समिती इ. नागरी समाज संघटनांच्या बॅनरखाली प्रकल्पग्रस्तांनी विरोध केला. २००६

मध्ये शेकाप नेते मोहन पाटील यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. परिणामी २००६ च्या जि. प. निवडणूकांत शेकापला ६१ पैकी ४२ जागी विजय मिळाला. पुढे जि. प. ने सेझविरोधी ठराव मंजूर केला. रॅली, मोर्चा, धरणे, चर्चा, मेळावे, जेल भरो आंदोलन, आमरण उपोषण इ. मार्गांचा अवलंब करुन जनतेने आपला "सेझ" धोरणाला असलेला विरोध नोंदविला. अंतिमत: सुप्रीम कोर्टाने विरोधी निर्णय दिल्यानंतर सरकारने महामुंबई सेझ प्रकल्प बासनात गुंडाळला. पण अजूनही सरकारने त्यातून पूर्णत: माघार घेतलेली नाही. कारण छोटया प्रकल्पासाठी भूसंपादनाचा सरकारचा विचार आहे. आजही खाजगी दलालांच्या माध्यमातून कंपन्यांसाठी जमीन खरेदी मोठया प्रमाणात चालू आहे. महामुंबई सेझ कंपनीने १८४५ हेक्टर जमीन संपादित केल्याच्या बातम्या अलिकडेच वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाल्या आहेत. म्हणजेच भविष्यातील नव्या जनआंदोलनाला मिळालेले हे निमंत्रणच म्हणावे लागेल.

रायगड जिल्ह्यातीलच शहापूर-धेरंड गावासह नऊ गावात सरकार विरोधी शेतकरी असा संघर्ष गेली दोन वर्ष सुरु आहे. औष्णि विद्युत प्रकल्पासाठी या गावातील शेतजमीन संपादित केली जाणार आहे. शेतक-यांची जमीन संपादित केली जाणार असल्याने त्यांचा या प्रकल्पांना विरोध आहे. नऊ गाव संघर्ष समितीने या परिसरात व्यापक जनआंदोलन उभारले आहे. बाळगंगा, वरसई धरण प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत तर खाजगी विकासकांनी सर्व मानवी मूल्य धुडकावून जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. MMRDA च्या वाढत्या पाण्याची तहान भागवण्यासाठी या परिसरात धरण बांधले जाणार आहे. या गावक-यांवर दुस-यांदा विस्थापित होण्याची वेळ आली आहे.

**कोकणातील प्रमुख वीज निर्मिती प्रकल्प**

- शहापूर-धेरंड – रिलायन्स (४००० मे.वॉ.) टाटा (३००० मे.वॉ.)
- धोपावे - धोपावे कोस्टल पॉवर लि. (१६०० मे.वॉ.)
- जयगड – जिंदाल (१२०० मे.वॉ.)
- रनपार – फिनोलेक्स (१००० मे.वॉ.)
- जैतापूर - एन.पी.सी.एल्. (९६०० मे.वॉ.)
- गिर्ये - अल्ट्रागेमा (४००० मे.वॉ.)

**विकासाच्या राजकारणापुढील पेच**

१९९० नंतरच्या काळात महाराष्ट्रात विकासाचे राजकारण विकास प्रकल्पांचे समर्थन आणि विरोध या दोन्ही बाजूने होऊ लागले आहे. कोकणातील एन्रॉन विरोधी आंदोलन आणि जैतापूर प्रश्नावर होत असलेले आंदोलन ही त्याचीच मुख्य उदाहरणे म्हणता येतील. विकासाची संकल्पना नेमकी काय असली पाहिजे हा प्रश्न या निमित्ताने चर्चिला जातोच असे नाही. प्रकल्पांचे समर्थन करणारे स्थानिक गट सत्ताधारी पक्षाशी निगडित असतात. विकासासंदर्भातील चर्चा स्थानिक पातळीवर सुरु झाली पाहिजे ही गोष्ट असे गट राजकीय अभिनिवेशामध्ये विसरतात. एखाद्या भागात विशिष्ट विकास प्रकल्प राबवित असताना संबंधित गावे, ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांना कधीच विश्वासात घेतले जात नाही. ब-याचदा प्रकल्पाचे नियोजन दिल्ली व मुंबईतून होते त्यात स्थानिकांचा सहभाग नसतोच. म्हणजेच निर्णयप्रक्रिया ही लोकशाही पद्धतीने राबविली जात नाही. राजकीय सत्ता जशी पंचायत राज पद्धतीमध्ये विकेंद्रित आहे तसे निर्णयप्रक्रियांचे सुद्धा विकेंद्रिकरण करणे गरजेचे आहे. तसे झाले तर प्रकल्पांना होणारा विरोध कदाचित कमी होऊ शकतो. विकास प्रकल्प राबवित असताना स्थानिकांना सामावून घेणे महत्त्वाचे आहे. विकास विरोधी संघर्षाचे मुद्दे लक्षात घेतल्यास विकास प्रक्रिया पद्धतशीरपणे राबविणे शक्य होईल. प्रकल्पग्रस्तांना खाजगी कंपन्या किंवा सरकारकडून विश्वासात न घेणे, जमिनींचा योग्य मोबदला न देणे, पुनर्वसन कायद्याने निश्चित केलेले लाभ प्रकल्पग्रस्तांपर्यंत पोहोचू न देणे, नापिक-पडिक जमिनींच्या विकासाकडे लक्ष न देता सुपीक

जमिनी प्रकल्पाखाली आणणे, स्थानिकांना रोजगाराच्या भूलथापांमध्ये अडकवून त्यांच्या तोंडाला पाने पुसणे या मुद्दयांमुळेच प्रकल्पांना आजपर्यंत विरोध झाला आहे.

विकास कोणाला नको आहे असे नाही. पण विकासाला वरील मुद्दयांवर होणारा विरोध लक्षात घेता सरकारला धोरणात्मक पातळीवर विकासाचा विचार करणे गरजेचे आहे. विकास प्रकल्पांमध्ये विस्थापितांना, प्रकल्पग्रस्तांना सामावून घेऊन त्यांना पुनर्वसनाची हमी मिळाल्यास प्रकल्पांना होणारा विरोध कमी होऊ शकतो. कोकणाचा विचार केल्यास विकासाच्या राजकारणात समर्थक व विरोधकांचा पक्षीय अभिनिवेशच जास्त राहिला आहे. कारण विकासाचे प्रकल्प सार्वजनिक हितासाठी राबविले जातात असा समर्थकांचा दावा आहे पण अशा विकास प्रकल्पांच्या सार्वजनिक हिताची "सार्वजनिकता" तपासण्याची तसदी ते घेत नाहीत. प्रकल्पविरोधी गटसुद्धा त्या फंदात न पडता रस्त्यावरच्या आंदोलनात गर्क राहतात. अशा गुंतागुंतीतूनच विकासविषयक राजकारणाचा पेच निर्माण होतो. तो सोडविण्यासाठी प्रबळ अशा इच्छाशक्तीची आवश्यकता आहे. ती दोन्ही बाजूंनी दाखविली जात नाही. त्यामुळे विकासप्रक्रियेचा गुंता शिल्लक राहणार हे नक्की....!

### संदर्भ पुस्तके

1. Barthan P., 1984, The Political Economy of Development in India, Oxford : Basil Blackwell
2. Doherty B., 2002, Ideas and Actions in the Green Movement, London: Routledge
3. Guha Ramchandra, 2000, Environmentalism, A Global History, Oxford University Press: Delhi
4. Shah Ghanashyam (ed), 2004, Social Movements: A Review of Literature, New Delhi : Sage
5. Sheth D. L., 2004, Globalisation and New Politics of Micro-Movements, Economic and Political Weekly, Jannuary 3, 2004
६. भोळे भा.ल. व किशोर बेडकीहाळ, २००३, बदलता महाराष्ट्र, सातारा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी
७. धनागरे द.ना., २००५, संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव, पुणे, प्रतिमा प्रकाशन
८. धुपकर अलका, २०१०, अब लडाई जारी है, परिवर्तनाचा वाटसरू, १६ ते ३० सप्टेंबर, २०१०